॥ वर्ष - 8 । अंक - 63 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

गणपती बाप्पा मोरया

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 09 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews





## इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी

# नद्या प्रदूषणमुक्त करणार!

## नदीप्रदूषण मुक्तीचे काम लवकरच सुरू, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

। पिंपरी । महाईन्यूज

**इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी या नद्यांच्या प्रदूषणमुक्तीचे आराखडे तयार केले जात आहेत. नदीप्रदूषण मुक्तीचे काम लवकरच सुरू होईल. या तिन्ही नद्या प्रदूषणमुक्त करण्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.**

आळंदी येथे फ्रुटवाले धर्मशाळा येथे झालेल्या मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या आणि रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभीष्टचिंतन सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे विभागाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव-पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदिपान महाराज शिंदे (हासेगावकर), संजय महाराज पाचपोर या वेळी उपस्थित होते.

गड किल्ल्यांचा विकास, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण शासनाने हाती घेतले आहे. महाराष्ट्राला शेती, सिंचन, शिक्षण, उद्योग, आरोग्य, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये आधुनिक बनविण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगत शिंदे म्हणाले, की वारकरी संप्रदाय हा आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा आहे. समाज घडविण्याचे काम वारकरी संप्रदाय करतो. संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे आध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे.

### महाराष्ट्रात 52 टक्के परदेशी गुंतवणूक

राज्य शासनाने बंद पडलेले प्रकल्प सुरू केले. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक, अटल सेतू असे विकासाचे प्रकल्प राबविले. नवीन उद्योग आणले. महाराष्ट्र उद्योग, परदेशी गुंतवणुकीमध्ये आघाडीचे राज्य असून देशातील एकूणपैकी ५२ टक्के परदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



### वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य

आळंदी : वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करून राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा दाखविण्याचे काम करीत आहे. त्यातूनच समाज घडत आहे अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आळंदी येथे फ्रुट वाले धर्मशाळा येथे झालेल्या ह.भ.प मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या व ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ह.भ.प. कुरेकर महाराज यांना "शांतीब्रह्म" पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना "तुलसीदास" पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच संतपूजन करण्यात आले. यावेळी सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री दादा भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडा पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप संदीपान महाराज शिंदे (हासेगावकर), ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार प्राप्त हभप संजय महाराज पाचपोर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे, असेही ते म्हणाले.

> "आम्ही नियोजन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. मी देखील सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आहे. मलाही गरिबी माहिती आहे. सर्वात जास्त अर्थव्यवस्था चोख बजावणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते. म्हणून ही योजना सुरू केली. माझी लाडकी बहिण योजनेसाठी वर्षभराची तरतूद केली असून दरमहा निश्चित रक्कम मिळणार आहे. या योजनेबरोबरच लेक लाडकी लखपती योजना, मुलींना व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, एस. टी. प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना आदी योजना राबवित आहे. शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ आदीसाठी आतापर्यंत १६ हजार कोटी रुपये नुकसान भरपाई दिली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीला राज्याच्या नमो महासन्मान योजनेची ६ हजार रुपयांची जोड देऊन वर्षाला एकूण १२ हजार रुपये देण्यात येत आहेत.
>
> **–एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री

# बारामतीमधून उभे न राहिलेलेच बरे!

## अजित पवार 'तुम्हीच आमदार हवे,' कार्यकर्त्यांचा आग्रह

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विकासकामांच्या जोरावर लाखांच्या मताधिक्याने निवडून येणाऱ्या माणसांबाबत असे होत असेल, तर निवडणुकीला उभे न राहिलेलेच बरे,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आगामी निवडणूक न लढविण्याचे संकेत देतानाच लोकसभा निवडणुकीतील सुनेत्रा पवार यांच्या पराभवाबाबत खंतही व्यक्त केली.**



### मला अनेक कामे करायची आहेत

ही गोष्ट सगळ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. मी सोडून बारामतीला दुसरा कोणी तरी आमदार मिळायला हवा. काम करूनही अशी गंमत होणार असेल, तर झाकली मूठ सव्वा लाखांची असेच म्हणावे लागेल. मी सोडून दुसरा कोणी आमदार झाला म्हणजे बारामतीकरांना समजेल.''सन १९९१ पासून २०२४ पर्यंत बारामतीकरांनी मला संधी दिली. माझ्या कामाची तुलना अन्य कोणत्याही आमदारांबरोबर करता येणार नाही. बारामतीकरांच्या नादाला लागायचे काम नाही. बारामतीकरांनी मला शिकवायला जाऊ नये. मला उडवून लावले, तर तुमचे काय याचा विचार करा. मला अनेक कामे करायची आहेत.

अजित पवार यांनी हे विधान केल्यानंतर बारामतीमधील उपस्थित कार्यकर्त्यांनी त्याला जोरदार विरोध दर्शविला. 'बारामतीमध्ये तुम्हीच आमदार हवे,' असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला.'बारामतीमधून निवडणूक लढविण्यात रस नाही,' असे वक्तव्य करून अजित पवार यांनी मध्यंतरी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. त्या पार्श्वभूमीवर, बारामतीतील राष्ट्रवादी काँग्रेस भवनात रविवारी झालेल्या कार्यक्रमात अजित पवार म्हणाले, 'मी आता ६५ वर्षांचा झालो आहे. मी तसा समाधानी आहे. जिथे पिकते तिथे विकत नाही, ही गोष्ट सगळ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. मी सोडून बारामतीला दुसरा कोणी तरी आमदार मिळायला हवा. काम करूनही अशी गंमत होणार असेल, तर झाकली मूठ सव्वा लाखांची असेच म्हणावे लागेल. मी सोडून दुसरा कोणी आमदार झाला म्हणजे बारामतीकरांना समजेल.''सन १९९१ पासून २०२४ पर्यंत बारामतीकरांनी मला संधी दिली. माझ्या कामाची तुलना अन्य कोणत्याही आमदारांबरोबर करता येणार नाही. बारामतीकरांच्या नादाला लागायचे काम नाही. बारामतीकरांनी मला शिकवायला जाऊ नये. मला उडवून लावले, तर तुमचे काय याचा विचार करा. मला अनेक कामे करायची आहेत. मीपण माणूस आहे. मी जिथे दुसऱ्याला खासदार, आमदार करतो तिथे जर अशी परिस्थिती होणार असेल, तर झाकली मूठ सव्वा लाखाची राहिलेली बरी असे वाटते,' असे अजितदादा म्हणाले. 'मी पाच वेळा राज्याचा उपमुख्यमंत्री झालो. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री झाले. शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी विविध मंत्रिपदे सांभाळली. मात्र, त्यांनी कधीही अर्थ खाते स्वतःकडे ठेवले नाही. मी माझ्याकडे अर्थ खाते घेतले. त्या माध्यमातून मी मतदारसंघात निधी कसा आणता येईल याचा बारकाईने विचार केला. काही दिवसांपूर्वी माझ्या अर्थ खात्याबद्दल कोणी तरी टिप्पणी केली. त्यांना काय बोलायचे ते बोलू द्या, तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देऊ नका,' अशा शब्दांत त्यांनी बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली.पवार म्हणाले, 'बारामती मतदारसंघात मला अजूनही भरपूर कामे करायची आहेत. मी कामे करायची की नाही, हे तुमच्या हातात आहे. मीही एक माणूस आहे. इतके सगळे करूनही मला हे बघावं लागत असेल, तर मी निवडणुकीला उभा न राहिलेलाच बरा!'अजित पवार यांनी हे विधान केल्यानंतर बारामतीमधील उपस्थित कार्यकर्त्यांनी त्याला जोरदार विरोध दर्शविला. 'बारामतीमध्ये तुम्हीच आमदार हवे,' असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला.'बारामतीमधून निवडणूक लढविण्यात रस नाही,' असे वक्तव्य करून अजित पवार यांनी मध्यंतरी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. त्या पार्श्वभूमीवर, बारामतीतील राष्ट्रवादी काँग्रेस भवनात रविवारी झालेल्या कार्यक्रमात अजित पवार म्हणाले, 'मी आता ६५ वर्षांचा झालो आहे. मी तसा समाधानी आहे. जिथे पिकते तिथे विकत नाही.

# इंद्रायणी, चंद्रभागा या नद्या प्रदूषणमुक्त करणार

## नद्या प्रदूषणमुक्त करण्याची ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी या नद्यांच्या प्रदूषणमुक्तीचे आराखडे तयार केले जात आहेत. नदीप्रदूषण मुक्तीचे काम लवकरच सुरू होईल. या तिन्ही नद्या प्रदूषणमुक्त करण्याची ग्वाही अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.**



### महाराष्ट्रात 52 टक्के परदेशी गुंतवणूक

राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे आध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे.राज्य शासनाने बंद पडलेले प्रकल्प सुरू केले. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक, अटल सेतू असे विकासाचे प्रकल्प राबविले. नवीन उद्योग आणले. महाराष्ट्र उद्योग, परदेशी गुंतवणुकीमध्ये आघाडीचे राज्य असून देशातील एकूणपैकी ५२ टक्के परदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे.

आळंदी येथे फ्रुटवाले धर्मशाळा येथे झालेल्या मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या आणि रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभीष्टचिंतन सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे विभागाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव-पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदिपान महाराज शिंदे (हासेगावकर), संजय महाराज पाचपोर या वेळी उपस्थित होते.गड किल्ल्यांचा विकास, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण शासनाने हाती घेतले आहे. महाराष्ट्राला शेती, सिंचन, शिक्षण, उद्योग, आरोग्य, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये आधुनिक बनविण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगत शिंदे म्हणाले, की वारकरी संप्रदाय हा आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा आहे. समाज घडविण्याचे काम वारकरी संप्रदाय करतो. संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे.

## पिंपरी-चिंचवडकरांच्या जिव्हाळ्याचा

# भामा आसखेड पाणी प्रकल्प लांबणीवर का पडला?

## विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा पाण्याचे राजकारण होतेय का?

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. शहरात वाढलेले नागरीकरण आणि पाण्याची मागणी याचा विचार करता प्रमाण व्यस्त आहे. त्यामुळे पाणी समस्या हा शहरातील सोसायटीधारक आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनातील कळीचा मुद्दा आहे.**




आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी व महायुती अशा दोन्ही बाजुंच्या इच्छुकांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. मग, अशा तापलेल्या राजकीय वातावरणात पाण्याचा मुद्दा उपस्थित झाला नाही, तर नवल वाटायला नको.

"भामा आसखेड प्रकल्पातून पुण्याला पाणी मिळाले. मग, पिंपरी-चिंचवडकरांना का नाही? "असा प्रश्न सोशल मीडियावर उपस्थित केला जात आहे. त्यामुळे 'महाईन्यूज'च्या माध्यमातून भामा आसखेड प्रकल्पाबाबत FACT CHECK करण्यात आला.

पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकृत माहितीनुसार,

**1.** पुणे महानगरपालिकेसाठी भामा आसखेड प्रकल्पातील पाण्याचे आरक्षण २०११ मध्ये मंजुर झाले. मात्र, पिंपरी-चिंचवडसाठी पाणी आरक्षण २०१३ मध्ये म्हणजे पुण्यापेक्षा दोन वर्षांनी उशीरा मंजूर झाले आहे.

**2.** पुणे महानगरपालिकेने २०११ मध्ये पाणी उचलण्याची परवानगी मिळाल्यानंतर सदर प्रकल्प तातडीने सल्लागार नियुक्ती केली आणि जेएनएनयुआरएम योजनेतून निधी मिळण्याबाबत केंद्र सरकारकडून मंजुरी मिळवली.

**3.** जलसंपदा विभागाने मागणी केलेला पाणी पुनःस्थापना खर्च माफ करावा. यासाठी पाठपुरावा केला. मात्र, प्रकल्पाची गरज ओळखून सोबतच निविदा प्रक्रियाही सुरू केली. पण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सत्ताकाळातील कारभाऱ्यांनी पाणी पुनःस्थापना खर्च माफ झाला नाही, म्हणून निविदा प्रक्रिया राबवली नाही.

**4.** पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी सदर प्रकल्प एकत्रित व्हावा, अशी चर्चा २०१०-११ मध्ये होती. पण, पुणे महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया सुरू केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला मंजुरीच दोन वर्षे उशीरा मिळाली. त्यात २०१३ ते २०१७ पर्यंत कार्यवाही केली नाही.

**5.** २०१७ मध्ये पिंपरी-चिंचवडचे भामा आसखेड प्रकल्पातील आरक्षण रद्द झाले. त्यानंतर पुन्हा राज्य सरकारकडे पाणी पुनःस्थापना खर्च माफ करण्याची विनंती करण्यात आली. मात्र, सदर खर्च माफ होवू शकत नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर पुनःस्थापना खर्च भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

**6.** २०१७-१८ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने भामा आसखेडसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली. जून-२०२५ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे ध्येय आहे.

**7.** २०११ मध्ये आरक्षण मिळाल्यानंतर पुणे महानगरपालिकेने २०१३ मध्ये कार्यवाही सुरू केली. हा प्रकल्प २०२१ मध्ये म्हणजे सुमारे ८ वर्षांत पूर्ण झाला आहे.

**तात्पर्य : "भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी पुण्याच्या तुलनेत पिंपरी-चिंचवडला उशीरा का मिळाले?" अशा प्रकारच्या सोशल मीडियावरील आरोपांमध्ये तथ्य दिसत नाही. हा FAKE NARRATIVE चा प्रकार आहे.**

### काँग्रेस-राष्ट्रवादीच्या इच्छाशक्तीअभावी प्रकल्प रखडला..!

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून भामा आसखेड प्रकल्प राबवण्यात येत आहे. पुण्यात २०१३ मध्ये आणि पिंपरी-चिंचवडमध्ये २०१८ मध्ये सदर प्रकल्पाची कार्यवाही सुरू झाली. प्रकल्पाच्या कामाचे स्वरुप एकच असले, तरी पुणे मनपाला सदर काम पूर्ण करण्यासाठी सुमारे ८ वर्षांचा कालावधी लागला आहे. तर, पिंपरी-चिंचवडमधील अशाच प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सत्ताकाळात सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपयांचे बजेट असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने २१७ कोटी रुपयांचा सिंचन पुनः स्थापना खर्च वेळेत भरला असता, तर आरक्षण रद्द झाले नसते आणि प्रकल्प लवकर सुरू झाला असता. तसेच, आज शहरात पाणी दाखलसुद्धा झाले असते. तांत्रिक मुद्यांचा विचार करता पुणे आणि पिंपरी-चिंचवड अशी या प्रकल्पाची तुलना होवू शकत नाही. कारण, पुण्याच्या प्रकल्पाचे काम २०१३ मध्ये आणि पिंपरी-चिंचवडच्या प्रकल्पाचे काम २०१८ मध्ये सुरू झाले आहे. पार्लमेंट ते पालिका काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असताना भामा आसखेड प्रकल्पाचे आरक्षण मंजूर करुन घेता आले नाही. तसेच, दोन वर्षे उशीरा मिळालेले आरक्षण सिंचन पुनःस्थापना खर्च न भरल्यामुळे रद्द झाले. पुण्याप्रमाणे कोणतीही निविदा प्रक्रिया २०१३ ते २०१७ या चार वर्षात राबवता आली नाही. त्यामुळे राजकीय इच्छाशक्तीअभावी भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडसाठी पाणी पुरवठ्याबाबत वरदान असलेला भामा आसखेड प्रकल्प रखडला.

---

## ऐन गणेशोत्सवात नागरिकांना फटका

## पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये सीएनजीच्या दरात मोठी वाढ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऐन गणेशोत्सवात पुणेकरांना मोठा फटका बसला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह परिसरात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसच्या (CNG) किंमतीत ९० पैशांनी वाढ करण्यात आली आहे. याआधी पुण्यात आणि परिसरात सीएनजी प्रतिकिलोसाठी ८५ रुपये द्यावे लागत होते.**




आता नागरिकांना सीएनजी प्रतिकिलोसाठी ८५.९० रुपये मोजावे लागणार आहेत. हे नवीन दर आजपासून लागू झाले आहेत. असं असलं तर पीएनजी दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी या शहरांना सीएनजी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने (एमएनजीएल) आंतरराष्ट्रीय नैसर्गिक वायू बाजारपेठेत वाढत्या किमतीमुळे दरवाढीची घोषणा केली. ही वाढ नाममात्र असली तरी सीएनजीची वाढती मागणी आणि आयात खर्च यामुळे ही वाढ झाली आहे.

सीएनजीच्या दरात वाढ झालेली असली तरी सीएनजीचे दर पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत खूपच कमी आहेत. त्यामुळे सीएनजी हा स्वस्त इंधनाचा पर्याय वाहनचालकांसमोर आहे. नव्या किमतीनुसार सीएनजीचा दर 85.90 रुपये प्रति किलोग्रॅम इतका आहे. म्हणजेच पेट्रोलच्या तुलनेत अंदाजे 49 टक्के आणि डिझेलच्या तुलनेत अंदाजे 27 टक्क्यांनी पैशांची बचत होते.

### वाहनचालकांची चिंता वाढली

सीएनजीच्या किंमतीत वाढ केल्यानंतर एमएनजीएलने म्हटलं आहे की, आजही पारंपारिक इंधनाला कमी खर्चिक पर्याय हा सीएनजीच आहे. पेट्रोलच्या तुलनेत सीएनजीमुळे ४९ टक्के बचत होते. तर डिझेलपेक्षा सीएनजी २७ टक्के स्वस्त आहे. पेट्रोल किंवा डिझेलऐवजी सीएनजी वापरताना रिक्षाचालकांना २९ टक्के बचतीचा फायदाही होतो. दरम्यान, याआधी जुलैमध्येही सीएनजीच्या किमतीत १.५० रुपये प्रतिकिलोने वाढ झाली होती. यानंतर सीएनजीची किंमत ८५ रुपये प्रतिकिलो झाली होती. सीएनजीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने पेट्रोल आणि डिझेलला पर्याय म्हणून या पर्यावरणपूरक इंधनाकडे वळलेल्या वाहनचालकांची चिंता वाढली आहे.



## भूमिका

# वेशीबाहेरील मुलांची शाळा

**देशातील प्रमुख प्रगतशील राज्य अशी आपल्या महाराष्ट्राची ओळख... प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा सांगणारा, विवेकाची कास धरल्याचा अभिमान बाळगणारा हा प्रदेश... तरीही वेशीबाहेरील वस्तीचे दु:ख पूर्णपणे दूर करण्यात यश मिळाले नाही. मात्र, त्या ध्येयाच्या दिशेने अविरत चालणारी पावले आपल्याला दिसतात.**

वैयक्तिक, भौतिक सुखाचा विचार न करता वंचित समूहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचा हरपलेला सन्मान परत मिळवून देण्यासाठी काम करणारे हजारो हात राज्यभर विखुरलेले पाहायला मिळतात. वर्धा जिल्ह्यातील रोठा या गावातील ‘उमेद’ ही संस्थाही त्याच साखळीतील मोलाचा दुवा आहे. टिश काळापासून ‘गुन्हेगारी जमात’ हा कलंक अंगावर बसलेल्या व आजही त्याचे चटके झेलणाऱ्या पारधी समाजाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी अद्याप वक्रच आहे. कधीच कायमचा पत्ता नसलेली व हल्ली मुक्काम कुठे, हेही सांगता न येणाऱ्या या समाजाचे वंचितपण अजूनही कायम आहे. येणाऱ्या प्रत्येक पिढीने ‘परंपरागत’ कामेच करावी, या मानसिकतेच्या दुष्टचक्रात अडकलेला हा समाज पोटच्या मुलाबाळांना भीक मागण्यासाठी अजूनही पिटाळतो. हे चित्र पाहून मन विदीर्ण झालेल्या मंगेशी मून यांनी त्यामध्ये बदल घडवण्याचा संकल्प सोडला. मंगेशी यांच्या वडिलांनी त्यांना वर्ध्याजवळ रोठा या गावी शेतजमीन दिली होती.



त्याचा उपयोग वैयक्तिक लाभासाठी करून घेण्याऐवजी मून यांनी त्यावर उमेद प्रकल्पाचा पाया रचला. पारधी समुदायातील तसेच अन्य काही वंचित समूहातील मुलांसाठी हा प्रकल्प २०१४-१५पासून भविष्यासाठी आशेचा किरण ठरला आहे.हा प्रकल्प वर्ध्यामध्ये उभारण्यात आला असला तरी त्याची सुरुवात मुंबईत झाली. लोकलने प्रवास करताना मंगेशी मून यांना फलाटाच्या आजूबाजूला पारधी कुटुंबे दिसायची. या कुटुंबांमधील मुले भीक मागण्याच्या नादात गाडीखाली आली, काही अपंग झाली. अशा वेळी पोटातील भुकेची आग माणुसकीचा कसा बळी घेते हे मून यांना दिसले. आपली मुले अपंग झाली याबद्दल त्यांच्या आईवडिलांना फार दु:ख नसायचे. अपंग मुलांना जास्त भीक मिळेल ही भावना अधिक प्रबळ असायची. मून यांनी रस्त्यावरील सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांशी संवाद वाढवला. त्यातून त्यांना मिळालेली माहिती त्रासदायक होती. भीक मागण्यासाठीच मुलांना जन्म द्यायचा. स्वत:ला मूल नसेल तर दुसऱ्याची मुलं भाड्याने घ्यायची. भिकेचे हिस्से करायचे. मुलांनी भीक मागून मिळवलेला पैसा दारू, जुगार यामध्ये घालवायचा. भांडण-तंटेही नेहमीचेच. हे सर्व प्रकार लक्षात आल्यावर मंगेशी मून यांनी मुंबईत भीक मागणाऱ्या मुलांचा ठिकठिकाणी शोध घेतला. यापैकी काही मुले वर्ध्याजवळ पारधी बेड्यावरील असल्याचे त्यांना समजले. भीक मागण्यासाठी ही वंचित कुटुंबे महानगरात स्थलांतर करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर या मुलांचा शोध घेण्याचे काम सुरू झाले. मुंबईत लोकलमध्ये, आझादनगर, बँडस्टँड अशा ठिकाणी भीक मागणाऱ्या मुलांचा शोध घेतला. सानपाडा पुलाखालून १८ मुलांना त्या रोठा येथे घेऊन आल्या. त्यांच्या पुनर्वसनासाठी ‘उमेद एज्युकेशनल ट्रस्ट’ स्थापन केला. गेल्या दशकभरात उमेदच्या कामाचा पसारा वाढत तिथे सध्या साधारण ७० मुले आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत राहत आहेत. या मुलांना रोठा येथे आणल्यानंतर त्यांच्या राहण्याची सोय झाली. पण मुलांसाठी कपडेलत्ते आणि जेवणाचा प्रश्न मुख्य होता. त्यासाठी मून यांनी अनेकांकडे मदत मागितली. दान देण्याचे आवाहन समाजमाध्यमांवर केले. त्याला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला. मात्र केवळ यावर अवलंबून राहणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी स्वत:च्या शेतात धान्य पिकवायला सुरुवात केली. त्यातून थोडाफार पैसा मिळाला आणि जेवणाची भ्रांत मिटली. यापुढचा टप्पा अधिक परीक्षा पाहणारा होता. या मुलांना शाळेत दाखला मिळावा या हेतूने मून त्यांना घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्या. पण मुलांच्या नावाचा एकही शासकीय किंवा कौटुंबिक चिटोराही नव्हता. त्यामुळे त्यांना शाळेत दाखल कसे करायचे असे म्हणत शाळेकडून त्यांना परतवून लावण्यात आले.

## प्रासंगिक »

### देश बदल रहा है..!

***गेले काही दिवस बाजारात काही चिमुरड्या कंपन्या आणि त्यांचे भव्य, अवाढव्य आयपीओ याविषयी बरीच उलट-सुलट चर्चा सुरू आहे.***

गोष्ट नव्या सहस्राकाच्या पहिल्याच वर्षातली. साधारण २३ वर्षांपूर्वीची. म्हणजे तशी ताजीच. भांडवली बाजारात एकाच क्रमांकाचे समभाग दोघाचौघांना वितरित होणं, हर्षद मेहता, ‘सेबी’चा मग डिमॅटचा निर्णय आणि त्यानंतरची ही गोष्ट. ‘युनिट-६४’च्या संदर्भातली. युनिटचा वाद झडला २००० सालच्या डिसेंबरात. ‘युनिट ६४’ ही देशातली पहिली म्युच्युअल फंड स्कीम म्हणता येईल. त्या वेळी या युनिट्सची खरेदी-विक्री व्हायची. पण ती व्यवस्थापनानं ठरवलेल्या किमतीवर. तिचा युनिटच्या ‘नेट ॲसेट व्हॅल्यू’शी काही संबंध नसायचा. त्यात ‘यूटीआय’नं त्या वेळी इतका लाभांश द्यायला सुरुवात केली की त्याचा आणि या योजनेतल्या परताव्याचा काही संबंधच नसायचा. म्हणजे योजनेचा परतावा प्रत्यक्षात १० टक्के इतकाही नाही आणि लाभांश मात्र २८ टक्के वा अधिक. असो. विषय हा नाही. (तरीही ज्यांना याची अधिक माहिती हवी आहे.

देशात ईव्हीएमच्या दोषांटी चर्चा सुरू होते. कोणतेही मशीन बिघडू शकते हे खरेच, पण ईव्हीएमचा गैरवापर रोखण्यासाठी असलेल्या तरतुदी ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक ठेवतात.नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या काही दिवसांआधी ही निवडणूक ईव्हीएमद्वारे न घेता मतपत्रिकेद्वारे घ्यावी.

# कुठलीही मशीन हॅक केली जाऊ शकते

निवडणूक आयोग ईव्हीएमऐवजी मतपित्रकेद्वारे निवडणूक घेण्यास बाध्य होईल. सर्वोच्च न्यायालयात ईव्हीएमच्या व्हीव्हीपॅटमधून निघणारी प्रत्येक मतचिठ्ठी मोजली जावी, यासाठी याचिका करण्यात आल्या. पण शेवटी लोकसभेची निवडणूक ईव्हीएमद्वारेच घेण्यात आली आणि निकालानंतर ईव्हीएमद्वारे झालेल्या निवडणूक प्रक्रियेवर एकाही मान्यताप्राप्त राजकीय पक्षाने किंवा त्या पक्षांच्या नेत्यांद्वारे औपचारिक आक्षेप घेण्यात आल्याचे ऐकिवात नाही. मागच्या काही वर्षांत प्रत्येक निवडणुकीच्या आधी ईव्हीएमविषयी अविश्वास व्यक्त करणे, आंदोलने, न्यायालयात याचिका दाखल करणे ही सामान्य बाब झाली होती. प्रत्येक निवडणुकीनंतर ज्या पक्षांना निवडणूक जड गेली असे पक्ष आणि नेते ईव्हीएमवर आक्षेप घेताना दिसून येतात आणि यातून भारतीय जनता पक्षदेखील सुटलेला नाही. २००९ ची लोकसभा निवडणूक हरल्यानंतर भाजप नेते जी. एल. व्ही. नरसिम्हा राव



यांनी ‘डेमोक्रसी ॲट रिस्क : कॅन वुई ट्रस्ट ईव्हीएम’ हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकाचे प्रकाशन त्या वेळचे भाजप अध्यक्ष नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले होते. योगायोग म्हणावा की काय, पण जो पक्ष सत्तेत आहे, तो ईव्हीएमची पाठराखण करताना दिसतो आणि विरोधक त्यावर प्रश्न उपस्थित करताना दिसतात. पण ईव्हीएमविषयीच्या या सर्व चर्चेच्या मुळाशी ईव्हीएमविषयीचे अपुरे ज्ञान असल्याचे दिसते. अगदी राष्ट्रीय पक्षांच्या मोठ्या नेत्यांनासुद्धा सध्या कुठला ईव्हीएमचा प्रकार प्रचलित आहे, त्याची मत साठवण्याची क्षमता, ईव्हीएम कोण बनवते आणि ईव्हीएम बनवण्यापासून मतदान केंद्रापर्यंत ती मशीन कुठल्या प्रक्रियेतून येते याबाबत पुरेशी माहिती नसल्याचे दिसून येते. भारतात निवडणुकीत वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) फक्त दोन कंपन्या बनवतात. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) आणि इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ईसीआयएल). भारतात ईव्हीएम पहिल्यांदा १९८२ साली केरळमधील एका निवडणुकीत वापरण्यात आले होते.पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुका पूर्णपणे ईव्हीएमद्वारे घेण्यात आल्या. तेव्हापासून सर्व राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका ईव्हीएमद्वारेच घेण्यात येतात आणि २००४ पासून लोकसभेच्या निवडणुकाही ईव्हीएमद्वारे घेण्यास सुरुवात झाली. २००६ च्या आधी ज्या ईव्हीएम वापरात होत्या, त्यांना एम-वन ईव्हीएम असे संबोधले जायचे. २००६ ते २०१३ या दरम्यान जे ईव्हीएम वापरले जायचे, त्याचे नाव ‘एम-टू’ असे होते आणि २०१३ पासून आतापर्यंत ज्या ईव्हीएम वापरण्यात येत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवारांनी पक्ष हिसकावून घेतला

## अजित पवारांच्या त्या वक्तव्यावर आव्हाडांचं आव्हान

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीचा पराभव जिव्हारी लागल्यानंतर अजित पवारांनी अनेकदा अनेक गोष्टींची कबुली दिली. बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवारांना उमेदवारी द्यायला नको होती इथपासून कुटुंबातील फूट समाजात स्वीकारला जात नाही, याचा अनुभव मीही घेतलाय इथपर्यंत अजित पवारांची वक्तव्ये कायम चर्चेत राहिली. त्यांच्या या वक्तव्यावरच शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिलंय. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अजित पवारांवर टीका केली.**





एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा", असं आज अजित पवार म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, "अजित पवार बारामतीतूनच लढणार. लोकांची मानसिकता संभ्रमावस्थेत नेणं ही एक कला आहे. या कलेचा ते वापर करत आहेत. बारामती त्यांच्यामुळे उभी राहिली हे त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. बारामती उभी राहिली ती पवारांमुळे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.अजित पवारांनी पक्ष हिसकावून घेतला. राजकीय करामती केल्यात. एवढा पश्चाताप घर फोडण्याचा होत असेल तर जाऊन एकदा पत्रकारांना सांगा हा पक्ष मी शरद पवारांच्या घरातून चोरून आणला आहे, आणि मी आता त्यांना देऊन टाकतो. मी माझी निशाणी घेऊन लढतो", असं आव्हान जितेंद्र आव्हाडांनी दिलं.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांची दादागिरी होती. एकही माणूस त्यांच्याविरोधात ब्र सुद्धा काढायचा नाही. तो त्यांना घाबरून नाही. ही तक्रार पवारांपर्यंत गेली तर पवार नाराज होतील, या भीतीने. आता तसं नाहीय. आता तिथे ना पवार साहेब आहेत आणि कोणी कोणाला घाबरत नाही", असंही ते म्हणाले. "वेळोवेळीच्या मुख्यमंत्र्यांचा अजित पवारांनी केलेला जाहीर अपमान आम्ही सर्वांनी पाहिला आहे. पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण यांचा त्यांनी अपमान केलाय.सहकाऱ्यांना तुच्छ पणाची वागणूक मिळायची. पवारांमुळे कोणीही बोललं नाही. के सी पाडवींना तर इतकं घालून पाडून बोलायचे, ते कॅबिनेट मंत्री आहेत, आदिवासी असले म्हणून काय झालं?" असंही त्यांनी सांगितलं.महाराष्ट्रात सध्या आगामी विधानसभा निवडणुकांची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. राज्यात निवडणुका नेमक्या कधी होणार? याची उत्सुकता मतदारांप्रमाणेच राजकीय पक्ष व त्यांच्या कार्यकर्त्यांनाही लागली आहे. जम्मू-काश्मीर व हरियाणाच्या निवडणुका आयोगानं आधी जाहीर केल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुका दिवाळीआधी की दिवाळीनंतर? यासंदर्भात तर्क-वितर्क लावले जात आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून राज्यभर मतदारांशी संवाद साधला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बारामतीमध्ये पक्षकार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकीबाबत सूचक विधान केलं आहे.बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना महायुतीकडून तिकीट देण्यात आलं होतं. मात्र, सुप्रिया सुळेंसमोर त्यांचा पराभव झाला. खुद्द अजित पवारांच्या बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळेंना सर्वाधिक मताधिक्य मिळालं. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकांवर याचा परिणाम होणार असे अंदाज वर्तवले जात होते. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी बारामतीमधून निवडणूक लढवण्यास इच्छुक नसल्याचं सांगितल्यानंतर तर्क-वितर्कांना उधाण आलं. त्याचसंदर्भात अजित पवारांनी आज बारामतीमध्ये बोलताना भाष्य केलं.

अजित पवारांनी यावेळी लवकरच निवडणुकांची घोषणा होणार असल्याचे सूतोवाच केले. "मागचं सरकार २०१९ च्या निवडणुकीत २६ नोव्हेंबरला स्थापन झालं होतं. त्यामुळे नवीन सरकार २६ नोव्हेंबरच्या आत स्थापन झालं पाहिजे असा एक नियम आहे. निवडणूक आयोग कधी निवडणूक घेईल माहिती नाही. खूप जण निधीची मागणी करत आहेत.

### मीही आता 65 वर्षांचा झालोय

पण आता मी निधीसाठी फाईलवर रिमार्क काहीही दिला, तरी तो मंजूर होईपर्यंत आचारसंहिता लागेल. त्यामुळे सगळ्यांनी याचा विचार करावा", असं अजित पवार म्हणाले आहेत."बारामतीत आपण सर्वांगीण विकास केला. राज्यात सर्वाधिक निधी दिला. मीही एक माणूस आहे. मला कधीकधी विचार येतो की एवढी सगळी कामं करूनही बारामतीकर वेगळा निर्णय घेऊ शकतात. आता मलाही राजकारणात ३३-३४ वर्षं झाली आहेत.

# मुंबईतील उद्योग पळवले, आता लालबागचा राजा

## अमित शाहांच्या दौऱ्याबाबत संजय राऊतांचा आरोप

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाचं दर्शन घेण्याकरता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईत येणार आहेत. परंतु, त्यांच्या या मुंबई दौऱ्यावरून ठाकरे गटाचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. मुंबई लुटण्याकरता हे केंद्रीय मंत्री मुंबईत येत असतात, असं राऊत म्हणाले. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

अमित शाहांच्या मुंबई दौऱ्याबाबत संजय राऊत म्हणाले, "अमित शाहांना आमचा विरोध यासाठीच आहे की महाराष्ट्रात त्यांनी दळभद्री राजकरण करून महाराष्ट्र कमजोर करण्याचा प्रयत्न केला. मुंबई, महाराष्ट्रातून ज्या पद्धतीने व्यापार, उद्योग, रोजगार आणि अनेक महत्त्वाचे आर्थिक केंद्र गुजरातला नेल्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अमित शाहांच्या बाबतीत महाराष्ट्राच्या भावना तीव्र आहेत. अमित शाह गृहमंत्री असले तरीही ते कमजोर गृहमंत्री आहेत."या महाराष्ट्राची कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. जम्मू काश्मीर, मणिपूरमध्ये या देशातील गृहमंत्र्यांचं लक्ष नाही. राजकारण, पक्ष फोडी,



लूटमार यांना पाठिंबा देणं, मुंबई लुटणं, लुटणाऱ्याला पाठिंबा देणं अशी कामं केली जात आहेत. शिवसेना राष्ट्रवादीसारखे स्वाभिमानी पक्ष फोडून महाराष्ट्र अधिक फोडणे अशी कामं त्यांनी केली. महाराष्ट्र विकलांग करायचं हे त्यांचं स्वप्न आहे. त्यासाठीच ते महाराष्ट्रात येत असतात. म्हणून महाराष्ट्राची जनता त्यांना शत्रू मानते", अशीही टीका संजय राऊत यांनी केली.लालबागच्या राजाच्या दर्शनाला ते येत आहेत. येऊद्या. मला तर सारखी भीती वाटते की ज्या प्रमाणे मुंबईतील अनेक उद्योग पळवले, अनेक संस्था गुजरातमध्ये पळवल्या. त्याप्रमाणे ते लालबागचा राजा तर गुजरातला नेणार नाहीत ना.. ते काहीही करू शकतात. लालबागच्या राजाचं मोठं नाव आहे, देशभरातून लोक येत असतात. चला गुजरातला घेऊन जाऊयात.

### महाराष्ट्र विकलांग करायचं हे स्वप्न

असं होऊ शकतं. लालबागचा राजाही गुजरातला नेण्याचा प्रस्ताव ठेवतील. व्यापारी लोक आहेत. मी तुम्हाला सांगतोय. मी फार विचारपूर्वक बोलतोय. हे लोक महाराष्ट्राला शत्रू मानत आहेत. भाजपाच्या अनेक लोकांना मुंबई लुटायची आहे", असं संजय राऊत म्हणाले. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आजपासून पुढील दोन दिवस मुंबईच्या दौऱ्यावर येणार आहेत. लालबागच्या राजाचे दर्शन घेण्याकरता ते मुंबईत येणार आहेत. गेल्यावर्षीही अमित शाह मुंबई दौऱ्यावर आले होते. महाराष्ट्र विकलांग करायचं हे त्यांचं स्वप्न आहे. त्यासाठीच ते महाराष्ट्रात येत असतात.

# ममता बॅनर्जींना मोठा धक्का!

## जवाहर सरकार यांचा राजीनामा, 'तृणमूल'वर केले गंभीर आरोप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**कोलकाता येथील आर.जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेनंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आलेलं आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआय करत आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगाल सरकारच्या विरोधात अनेक संघटनांनी आंदोलन केलं होतं. यानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावरही विरोधकांनी टीकेची झोड उठवली.**

खासदार जवाहर सरकार यांनी कोलकाता येथील आर.जी. कर वैद्यकीय रुग्णालयात महिला डॉक्टरांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबत त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांना पत्र लिहून पद सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं आहे. तसेच पक्षातील भ्रष्टाचाराचा मुद्दाही उपस्थित करत जवाहर सरकार यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली आहे. यासंदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.जवाहर सरकार यांनी म्हटलं की, “कोलकाता येथील आर.जी.कर हॉस्पिटलमध्ये घडलेल्या भीषण घटनेमुळे मला खूप दुःख झालं. ममता बॅनर्जी आपल्या जुन्या शैलीत या प्रकरणात हस्तक्षेप करतील अशी मला आशा होती. मात्र, तसं काही झालं नाही. हॉस्पिटलमध्ये घडलेल्या या भयंकर घटनेनंतर मी महिनाभर धीराने सहन केलं. ममता बॅनर्जी या डॉक्टरांशी भेट घेऊन चर्चा करतील, असं वाटलं होतं. पण तसं काही झालं नाही. माझ्यावर विश्वास ठेवा. जनतेचा हा रोष काही लोकांच्या आणि भ्रष्ट लोकांच्या वृत्तीविरोधात आहे. मी माझ्या संपूर्ण कार्यकाळात सरकार विरोधात एवढा अविश्वास कधीही पाहिला नाही”, असा आरोप जवाहर सरकार यांनी केला आहे.कोलकाता येथील आर.जी.कर रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याच्या घटनेनंतर प्रदीर्घ कालावधीनंतर राज्य सरकारने याबाबत कारवाईची भूमिका घेतली. पण संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर सरकारने तातडीने कारवाई केली असती तर बंगालमध्ये याआधी परिस्थिती पूर्वपदावर आली असती. राज्यात पंचायत आणि नगरपालिकांमधील स्थानिक पातळीवरील पक्षाच्या नेत्यांनी प्रचंड संपत्ती जमा केली आहे. त्यामुळे राज्यातील जनतेचं मोठं नुकसान झालं आहे. एवढंच नाही तर पक्षांच्या नेत्यांनीही मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवली आहे”, असा गंभीर आरोपही जवाहर सरकार यांनी केला.

जवाहर सरकार यांनी तृणमूल काँग्रेस पक्षाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पक्षाचा राजीनामा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे सोपविला असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. तसेच आपण लवकरच दिल्लीला जाऊन राज्यसभेच्या अध्यक्षांकडे राजीनामा सुपुर्द करणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. आपण राजकारणामधूनही संन्यास घेणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच बलात्कार आणि खूनाच्या घटनांबाबत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कठोर कारवाई करण्याची भूमिका घ्यावी, असं आवाहनही त्यांनी पत्रात केलं आहे.आता तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार जवाहर सरकार यांनी कोलकाता येथील आर.जी.कर वैद्यकीय रुग्णालयात महिला डॉक्टरांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबत त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांना पत्र लिहून पद सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं आहे. तसेच पक्षातील भ्रष्टाचाराचा मुद्दाही उपस्थित करत जवाहर सरकार यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली आहे.

### दिल्लीला जाऊन राजीनामा सुपूर्द

यासंदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.जवाहर सरकार यांनी म्हटलं की, “कोलकाता येथील आर.जी.कर हॉस्पिटलमध्ये घडलेल्या भीषण घटनेमुळे मला खूप दुःख झालं. ममता बॅनर्जी आपल्या जुन्या शैलीत या प्रकरणात हस्तक्षेप करतील अशी मला आशा होती. मात्र, तसं काही झालं नाही. हॉस्पिटलमध्ये घडलेल्या या भयंकर घटनेनंतर मी महिनाभर धीराने सहन केलं. ममता बॅनर्जी या डॉक्टरांशी भेट घेऊन चर्चा करतील, असं वाटलं होतं. पण तसं काही झालं नाही. माझ्यावर विश्वास ठेवा. जनतेचा हा रोष काही लोकांच्या आणि भ्रष्ट लोकांच्या वृत्तीविरोधात आहे. मी माझ्या संपूर्ण कार्यकाळात सरकार विरोधात एवढा अविश्वास कधीही पाहिला नाही”, असा आरोप जवाहर सरकार यांनी केला .

# पाकिस्तान 'त्या' एक कप चहाची किंमत चुकवतोय

## इशक दार यांची आगपाखड, तीन वर्षांपूर्वीच्या घटनेचा केला उल्लेख!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**पाकिस्तानची सध्याची आर्थिक स्थिती चिंताजनक झाली असून जागतिक संस्थांकडून पाकिस्ताननं मोठ्या प्रमाणावर कर्जही घेतलं आहे. त्याशिवाय, आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांकडून पाकिस्तानसाठी आर्थिक मदतदेखील केली जात आहे. पाकिस्तानमध्ये व पाकिस्तानच्या भूमीतून होत असणाऱ्या दहशतवादी कारवायांनी गंभीर रूप धारण केलं आहे.**

या सर्व परिस्थितीत पाकिस्तानच्या उपपंतप्रधानांनी लंडनमध्ये केलेलं विधान सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशक दार सध्या ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान यांनी ब्रिटिश सरकारमधील अनेक उच्चपदस्थांच्या भेटीगाठी घेतल्या. तसेच, तेथील पाकिस्तानी नागरिकांच्या संघटनांशीही संवाद साधला. यानंतर लंडनच्या बेलग्राविया भागातील पाकिस्तान हाय कमिशनच्या कार्यालयात त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. तेव्हा लंडन दौऱ्यासोबतच पाकिस्तानमधील सद्यस्थिती आणि त्यावरची कार्यवाही याबाबतही त्यांनी भाष्य केलं. पाकिस्तानी वृत्तसंस्था डॉननं याबाबत सविस्तर वृत्त दिलं आहे.

### दहशतवाद्यांना सोडण्यात आलं

इम्रान खान सरकारनं त्यांच्या काळात अनेक चुका केल्या. तसेच, त्यांच्या कारकिर्दीत लष्करी अधिकाऱ्यांनीही काही चुका केल्या. मात्र, विद्यमान सरकारच्या कार्यकाळात पाकिस्तान व ब्रिटन यांच्यातील द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत होतील, असे सूतोवाच त्यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना त्यांनी पाकिस्तानी गुप्तहेर संघटना आयएसआयचे माजी प्रमुख लेफ्टनंट जनरल फैझ हमीद यांच्या काबूल भेटीवरून संतप्त प्रतिक्रिया दिली.“पाकिस्तान सध्या अफगाणिस्तानच्या काबूलमध्ये तेव्हा घेतलेल्या त्या एक कप चहाची किंमत चुकवत आहे. त्यावेळी ज्या दहशतवाद्यांना सोडण्यात आलं होतं.

अष्टविनायक हा शब्द 'अष्ट' आणि 'विनायक' या दोन शब्दांच्या संयोगातून तयार झाला आहे. अष्ट म्हणजे आठ आणि विनायक म्हणजे आपले लाडके दैवत गणपती. कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी प्रथम गणपतीची पूजा केली जाते. कारण गणपतीबाप्पा चौदा विद्या ,चौसष्ट कलांचा अधिपती आहे आणि सर्व विघ्ने दूर करणारा गणपतीबाप्पा आपल्या मार्गातील सर्व अडथळे दूर करतो आणि समृद्धी देतो. ही मंदिरे प्रेक्षणीय स्थळांपैकी आहेत. या आठही मंदिरांची स्थापत्य रचना अतिशय उत्कृष्ट आणि मनाला आनंद देणारी आहे. वास्तविक पुण्याच्या जवळ विविध गावांत श्रीगणेशाची आठ मंदिरे आहेत, त्यांना अष्टविनायक म्हणतात. या मंदिरांना स्वयंभू मंदिरे असेही म्हणतात. स्वयंभू म्हणजे येथे भगवान श्रीगणेश स्वतः प्रकट झाले आहेत. म्हणजेच कोणीही त्यांची मूर्ती बनवून बसवली नाही. गणेश आणि मुद्गल पुराण यांसारख्या विविध पुराणांमध्येही या मंदिरांचा उल्लेख आढळतो. ही मंदिरे अतिशय प्राचीन असून त्यांना ऐतिहासिक महत्त्वही आहे. या मंदिरांच्या यात्रेला अष्टविनायक तीर्थयात्रा असेही म्हणतात. अष्टविनायक मंदिराच्या संदर्भात असे मानले जाते की तीर्थ गणेशाची ही आठ पवित्र मंदिरे स्वतःच उगम पावली आणि जागृत झाली.



पहिला गणपती- मोरगांवचा श्री मयुरेश्वर



दुसरा गणपती - सिद्धटेकचा श्री सिद्धेश्वर



तिसरा गणपती - पालीचा श्री बल्लाळेश्वर




चौथा गणपती - महाडचा श्री वरदविनायक



पाचवा गणपती - थेऊरचा श्री चिंतामणी



सहावा गणपती - लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मक



सातवा गणपती - ओझरचा श्री विघ्नेश्वर



आठवा गणपती - रांजणगांवचा श्री महागणपती



स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदम् ॥१॥
बल्लाळं मुरुडे विनायकमहं चिन्तामणिं थेवरे ॥२॥
लेण्याद्रौ गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे ॥३॥
ग्रामे रांजणनामके गणपतिं कुर्यात् सदा मंगलम् ॥४॥

# अष्टविनायक दर्शन !

# माँ कसम खाले नहीं लेगा सिंगल!

## लाइव्ह मॅचमध्ये ऋषभने कुलदीपला घ्यायला लावली शपथ

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचे अनेक स्टार खेळाडू सध्या खेळल्या जाणाऱ्या दुलीप ट्रॉफी २०२४ मध्ये खेळताना दिसत आहेत, ज्यामध्ये यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत आणि कुलदीप यादव देखील उपस्थित आहेत. ऋषभ पंत भारत ब संघाचा भाग आहे आणि कुलदीप यादव भारत अ संघाचा भाग आहे. दोन्ही संघात खेळला गेलेला सामना ऋषभच्या भारत ब संघाने ७६ धावांनी जिंकला. दरम्यान या सामन्यातील ऋषभ-कुलदीपचा एक मजेशीर व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये ऋषभ कुलदीपला आईची शपथ घ्यायला सांगताना दिसत आहे.**



अमेरिकन स्पर्धेपूर्वी सिन्नेरने सिनसिनाटी स्पर्धेत विजेतेपद मिळवले होते. मात्र, त्यानंतर सिन्नेर उत्तेजक द्रव्य सेवन चाचणीत दोषी आढळला होता. त्यानंतरही त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.दुलीप ट्रॉफीमधील दोन्ही भारतीय स्टार्सचा व्हायरल व्हिडीओ पाहून तुम्ही गोंधळून जाल की हे व्यावसायिक क्रिकेट आहे की गल्ली क्रिकेट? सामन्यादरम्यान पंतने कुलदीपला गल्ली क्रिकेटपटूप्रमाणे शपथ घेण्यास सांगितले. व्हायरल व्हिडीओमध्ये विकेट कीपिंग करताना पंत असे म्हणताना ऐकू येत आहे की, “तो सिंगल घेण्याचा प्रयत्न करेल, त्यासाठी सर्वांनी पुढे येऊन तयार रहा.”ऋषभ पंतचे हे वाक्य ऐकल्यानंतर फलंदाजी करत असलेला कुलदीप म्हणतो, “मी सिंगल घेणारच नाही.” कुलदीपचे हे उत्तर ऐकून ऋषभ त्याला म्हणतो, “आईची शपथ घेऊन सांग, सिंगल घेणार नाही.” पंत आणि कुलदीपच्या मजेशीर संवादाने चाहत्यांनाा गल्ली क्रिकेटची आठवण दिली. तसेच हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.सामन्याबद्दल बोलायचे तर शेवटच्या दिवशी २७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारत अ संघाने शुबमन गिल आणि मयंक अग्रवाल या सलामीवीरांच्या विकेट्स लवकर गमावल्या. पण केएल राहुल आणि रियान पराग यांनी महत्त्वाच्या धावा करत सामन्यात टिकून राहण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. केएल राहुल १२१ चेंडूत ५७ धावा करत सर्वाधिक धावा करणारा ठरला. त्यानंतर आकाश दीप सिंगने ४३ धावांची जलद खेळी खेळली. मात्र, इतर फलंदाज भारत ब संघाच्या वेगवान गोलंदाजीविरुद्ध अपयशी ठरले.दिवसाच्या पहिल्या सत्रात भारत ब संघ दुसऱ्या डावात १८४ धावांत आटोपला आणि एकूण २७४ धावांची आघाडी घेतली. मयंक अग्रवाल (३ धावा) दुसऱ्याच षटकात बाद झाल्याने भारत अ संघाची सुरुवात चांगली झाली नाही. रियान पराग (३१ धावा) क्रीझवर आला आणि त्याने शुबमन गिल (२१ धावा) सोबत ४८ धावांची भागीदारी केली. शुबमन गिल बाद झाल्यानंतर ध्रुव जुरेल खाते न उघडता बाद झाला. लंच ब्रेकवेळी त्यांची धावसंख्या ४ विकेट्सवर ७६ धावा होती, जी शिवम दुबे आणि तनुष कोटियन बाद झाल्यानंतर लवकरच ६ विकेट्स ९९ धावा अशी झाली. राहुलने १८० मिनिटे फलंदाजी करताना १२१ चेंडूंचा सामना केला. त्याने कुलदीप यादव (१४) सोबत सातव्या विकेटसाठी ४२ धावांची भागीदारी करून संघाचा पराभव काही काळासाठी टाळला. आकाश दीपने खालच्या फळीत ४३ धावांची खेळी खेळली, पण संघाला लक्ष्य गाठता आले नाही. तत्पूर्वी, भारत ब संघ ६ विकेट्सवर १५० धावांवर खेळताना केवळ ३४ धावा जोडू शकला.अमेरिकन स्पर्धेपूर्वी सिन्नेरने सिनसिनाटी स्पर्धेत विजेतेपद मिळवले होते. मात्र, त्यानंतर सिन्नेर उत्तेजक द्रव्य सेवन चाचणीत दोषी आढळला होता. त्यानंतरही त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.दुलीप ट्रॉफीमधील दोन्ही भारतीय स्टार्सचा व्हायरल व्हिडीओ पाहून तुम्ही गोंधळून जाल की हे व्यावसायिक क्रिकेट आहे की गल्ली क्रिकेट? सामन्यादरम्यान पंतने कुलदीपला गल्ली क्रिकेटपटूप्रमाणे शपथ घेण्यास सांगितले. व्हायरल व्हिडीओमध्ये विकेट कीपिंग करताना पंत असे म्हणताना ऐकू येत आहे की, “तो सिंगल घेण्याचा प्रयत्न करेल, त्यासाठी सर्वांनी पुढे येऊन तयार रहा.”ऋषभ पंतचे हे वाक्य ऐकल्यानंतर फलंदाजी करत असलेला कुलदीप म्हणतो, “मी सिंगल घेणारच नाही.” कुलदीपचे हे उत्तर ऐकून ऋषभ त्याला म्हणतो, “आईची शपथ घेऊन सांग, सिंगल घेणार नाही.” पंत आणि कुलदीपच्या मजेशीर संवादाने चाहत्यांनाा गल्ली क्रिकेटची आठवण दिली.

### व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

तसेच हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. सामन्याबद्दल बोलायचे तर शेवटच्या दिवशी २७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारत अ संघाने शुबमन गिल आणि मयंक अग्रवाल या सलामीवीरांच्या विकेट्स लवकर गमावल्या. पण केएल राहुल आणि रियान पराग यांनी महत्त्वाच्या धावा करत सामन्यात टिकून राहण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. केएल राहुल १२१ चेंडूत ५७ धावा करत सर्वाधिक धावा करणारा ठरला. मात्र, इतर फलंदाज भारत ब संघाच्या वेगवान गोलंदाजीविरुद्ध अपयशी ठरले.

# ऋषभने आपल्या कृतीने जिंकली चाहत्यांची मनं

## बांगलादेशविरुद्धच्यामालिकेत पंत पुनरागमन करणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा यष्टीरक्षक ऋषभ पंत सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतो. ऋषभ पंत सध्या दुलीप ट्रॉफीमध्ये खेळत आहे आणि त्याच्या इंडिया बीकडून खेळताना त्याने इंडिया ए विरुद्धच्या दुसऱ्या डावातही चांगली फलंदाजी करत अर्धशतकी खेळी साकारली. पण यावेळी तो त्याच्या फलंदाजीमुळे किंवा यष्टीरक्षणाने चर्चेत आला नाही.**



पंत चर्चेत येण्याचे कारण म्हणजे त्याने एक अशी कृती केली आहे, ज्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून तुम्ही हसू आवरू शकणार नाही. त्यामुळे कोणता व्हिडीओ आहे जाणून घेऊया. दुलीप ट्रॉफीमध्ये इंडिया ए विरुद्ध इंडिया बी यांच्या चौथ्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी, इंडिया ए संघाचा कर्णधार शुबमन गिल टीम हर्डलमध्ये आपल्या खेळाडूंशी संवाद साधत होता, त्यादरम्यान ऋषभही त्या हर्डलमध्ये सामील झाला. आम्ही तुम्हाला सांगतो की ऋषभ पंत हा भारत बी संघाचा एक भाग आहे आणि तो त्याच्या प्रतिस्पर्धी संघाच्या हर्डलमध्ये जाऊन सर्व काही ऐकत होता. या ऋषभच्या मजेशीर कृतीचा व्हिडीओ बीसीसीआय डोमेस्टिकने सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. ऋषभ पंतचा हा मजेशीर व्हिडीओ पाहून चाहतेही शेअर करत आहेत. पंतला विरुद्ध संघाच्या कोणत्याही खेळाडूने हर्डलमध्ये सहभागी होताना अडवले नाही. यावरून पंतचे इतर खेळाडूंशी कसे संबंध आहेत हे स्पष्ट होते.बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत ऋषभ पंत संघात पुनरागमन करणार हे जवळपास निश्चित झाले आहे, त्यामुळे दुलीप ट्रॉफीमधील कामगिरीसोबतच त्याच्या फिटनेसकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ऋषभ पंतचे शानदार अर्धशतक

या सामन्याच्या पहिल्या डावात पंतने नक्कीच निराशा केली होती. पण दुसऱ्या डावात तो अर्धशतक झळकावण्यात यशस्वी ठरला. इंडिया ए संघाविरुद्धच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंत फलंदाजीसाठी मैदानात आला, तेव्हा त्याच्या संघाने केवळ २२ धावांवर ३ विकेट्स गमावल्या होत्या. येथून पंतने आपल्या नैसर्गिक शैलीत फलंदाजी करत संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्याचे काम केले. ऋषभ पंतने अवघ्या ३४ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले.